# फॅशन . ( रीत, चाल )

आजच्या काळात फॅशन हा एक परवलीचा शब्द झाला आहे . आमच्या जमान्यात हा शब्दांचा संबंध बरेच वेळा कपडे या विषयाशी निगडीत होता .

आजतर हा जुना संबंध जास्तच घट्ट झाला आहे . रोज पेपर मध्ये फॅशन परेड, Designer, दुकाने यांच्या बातम्या आपण वाचतो . मला मात्र ह्या फॅशन परेड बघून बरेच प्रश्न पडतात . हे रॅम्प वरचे so Called फॅशन Costumes इतर वेळा का बघायला मिळत नाहीत ? हे कपडे घालून ९ . ०५ ची फास्ट लोकल पकडता येईल का ? व समजा लोकल मिळालीच तर Andheri ला उतरताना हेच कपडे चांगल्या स्थितीत राहतील का ? बरेच वेळा फॅशन परेड मधले कपडे हे शरीर झाकण्यापेक्षा उघडे कसे ठेवता येईल हेच दाखवित असतात .

आपण भारतीय मात्र कपडयाच्या बाबतीत अंधानुकरण करण्यातच धन्यता मानतो . विदेशात ( Australia, Newzeland) मध्ये cricket च्या मॅचला लोक कमी कपडयात येतात कारण अर्थातच त्या शहराच्या हवामानामुळे आणि आपल्याकडे पॅव्हेलियनमध्ये लोक सुटाबुटात घाम पुसत बसलेले असतात . असो .

फॅशन हा शब्द इतर वेळा सुद्धा वापरला जातो . हल्लीची कॉलेज मधील विद्यार्थामध्ये स्वतःला मिळालेले मार्क हे कसे अभ्यास न करताच मिळाले सांगण्याची फॅशन आहे .

पूर्वी व्यसन कोणी केलेच तर लपून छपून . पण आता हे मोकळेपणी सांगण्याची फॅशन आहे . मी दिवसाला किती सिगरेट ओढतो, माझी Bottom up ची capacity किती आहे, मी चैनीबरोबर हॉटेलात किती पैसे खर्च करतो वगैरे . हे चारचौघात मोकळेपणे सांगण्याची फॅशन च आहे .

हे सर्व करताना स्वतःला हे झेपेल कि नाही हा विचारच नसतो . दुसरा करतो ना मग मला मागे राहून चालणारच नाही . हाच विचार बळावलेला असतो .

हल्लीची पिढी कोठे जाणार आहे हे कळत नाही ? फॅशन